# महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ

वैद्यकीय शिक्षण व संशोधन शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत, चौथा मजला, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, पी.डीमेलो रोड, मुंबई - ४०० ००१. ई-मेल - msbnpe@gmail.com, दुरध्वनी : ०२२ -२२६२०३६०

## MAHARASHTRA STATE BOARD OF NURSING AND PARAMEDICAL EDUCATION

Directorate of Medical Education and Research, 4th Floor, St. Georges Hospital Campus, D' Melo Road, Fort, Mumbai – 400 001.
E-mail- msbnpe@gmail.com, Telephone – 022-22620360

क्र. मराशुवपशिमं/संलग्नता/२०२५-२६/ 2459/२०२५ दि. 31/०७/२०२५

प्रति,
प्राचार्य/संस्थाप्रमुख,
सर्व संलग्नीत परिचर्या प्रशिक्षण संस्था,
महाराष्ट्र राज्य.

विषय:- शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीता मंडळाकडून ए.एन.एम., जी.एन.एम., व इतर पोस्ट बेसिक डिप्लोमा अभ्याक्रमाकरीता संलग्नता देण्याबाबत.

संदर्भ :- १. क्र. मराशुवपशिमं/संलग्नता/२०२५-२६/१८७२/२०२५, दि. ३०/०५/२०२५
२. क्र. मराशुवपशिमं/संलग्नता/२०२५-२६/२०२०/२०२५, दि. ११/०६/२०२५
३. क्र. मराशुवपशिमं/संलग्नता/२०२५-२६/२३४८/२०२५, दि. १८/०७/२०२५

महोदय,

उपरोक्त संदर्भाधिन विषयान्वये संदर्भ क्र. १, २ व ३ नुसार सर्व प्राचार्य/संस्थाप्रमुख यांना मंडळामार्फत शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीता संलग्नता पत्र देण्यापूर्वी प्रत्येक संलग्नित संस्थेने Online Affiliation Registration करून घेण्यात यावे, याबाबतचे परिपत्रक मंडळाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले होते. संदर्भ क्र. ३ नुसार Online Affiliation Registration करण्याकरीताची अंतिम दिनांक ३१/०७/२०२५ होती, परंतु अद्याप काही संस्थांमार्फत Online Affiliation Registration करण्यात आलेले नाही.

त्याकरीता शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीता संलग्नता (Affiliation) मिळण्याकरीता दिनांक **०१/०८/२०२५ ते ३०/०८/२०२५ पर्यंत मुदतवाढ** देण्यात येत आहे. या कालावधीत Online पध्दतीने Online Affiliation Registration केल्यानंतर संस्थेची सर्व आवश्यक माहिती व मुळ कागदपत्रे Upload करून Submit करावे.

संस्थेमार्फत भरण्यात आलेली माहिती व मुळ कागदपत्रांची पडताळणी मंडळामार्फत करण्यात येईल. मंडळाकडून मान्यता (Approval) झाल्यानंतर संस्थेने संलग्नता शुल्क (Affiliation Fees) चा भरणा Online पध्दतीने करावा.

संस्थेकडून Upload करण्यात आलेली माहिती व मुळ कागदपत्रांमध्ये काही त्रुटी किंवा चुकीची माहिती आढळल्यास त्रुटींची पुर्तता केल्यानंतरच संलग्नता पत्र शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीता देण्यात येईल.

Online Affiliation Registration प्रक्रिया करण्याकरीता पानं क्र. ०२ वरील दिलेल्या प्रक्रियेचा वापर करावा. Online Affiliation Registration करताना काही अडचणी आल्यास खालील मंडळाच्या दूरध्वनीवर संपर्क करावा.

मोबाईल नंबर - ८९७६२७९९३१ ( IT- Department ) आणि ई-मेल - affiliation.msbnpe.2025@gmail.com

**टिप - शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीता संलग्नता पत्र प्राप्त नर्सिंग महाविद्यालयांना मंडळामार्फत विद्यार्थी नोंदणी करण्याकरीता Enrollment Portal सुरु करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.**

प्रबंधक
महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ

प्रत माहितीस्तव सविनय सादर:
१) मा. सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, नविन मंत्रालय, गो.ते. रू.संकुल, मुंबई.
२) मा. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन तथा आयुष विभाग, मुंबई.
३) मा. संचालक, महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ, मुंबई.